# <u>प्रेस नोट</u>

दिनांक - ०८/११/२०२४

**बेकायदेशीर कॉल सेंटरच्या माध्यमातुन परदेशी व भारतीय नागरीकांना संपर्क करून त्यांना 'गुगल सेवा' पुरवण्याच्या नावाखाली तसेच जास्त परताव्याचे अमिष दाखवून बंदी असलेल्या फॉरेक्स ट्रेडींग मध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडून त्यांची फसवणूक करणाऱ्या टोळीस उध्वस्त करण्यास गुन्हे शाखेला यश.**

---

मुंबई गुन्हे शाखा यांचे कक्ष-१० व कक्ष-११ यांना गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, काही इसम हे बेकायदेशीर कॉलसेंटर चालवुन परदेशी नागरीकांना गुगलची सेवा देणार असल्याचे भासवून त्यांची फसवणूक करत आहेत. तसेच बंदी असलेल्या फॉरेक्स ट्रेडींग मध्ये गुंतवणूक करण्यास भाग पाडून भारतीय नागरीकांची फसवणूक करत असल्याची माहिती प्राप्त झाली.

प्राप्त माहितीच्या अनुषंगाने मुंबई गुन्हे शाखेच्या कक्ष-१० व कक्ष-११ या कक्षातील अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी पोलीस पथके तयार केली व एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, कांदीवली पोलीस ठाणे, मुंबई यांचे हद्दीत सापळा रचुन छापा टाकला असता,

**कक्ष-१० यांनी एम.आय.डी.सी. पोलीस ठाणेच्या हद्दीत** '' ॲक्सेंन्टयुॲट ग्लोबल टेक्नॉलॉजीस्ट प्रा.लि., ८०२, ८ वा माळा, सी विंग, ट्रेड स्टार बिल्डींग, अंधेरी कुर्ला रोड, चकाला, जे.बी.नगर, अंधेरी पुर्व, मुंबई येथे एक बोगस कॉल सेंटर मिळून आले. सदर ठिकाणी बेकायदेशीर कॉल सेंटरव्दारे परदेशी नागरीकांना बनावट नाव धारण करून ते गुगल कंपनीतून बोलत असल्याचे भासवून त्यांचे गुगलवर असलेले बिझनेस प्रोफाईल हे बंद होणार असुन ते अपग्रेड करून देतो व त्यास ग्रीन टिक व्हेरीफाईड करून देतो असे खोटे सांगुन परदेशी नागरिकांकडून क्रेडीट कार्डद्वारे पैसे स्विकारून त्यांना गुगलची कोणतीही सेवा न पुरवता परदेशी नागरीकांची फसवणूक करताना मिळून आले. त्याचप्रमाणे **कक्ष-११ यांनी कांदीवली पोलीस ठाणेच्या हद्दीत** SPOT FIXIT SOLUTION ऑफीस नं. ४, २ रा मजला, अविराही आर्केड, वसनजी लालजी रोड, कांदिवली रेल्वे स्टेशनच्या जवळ, कांदिवली पश्चिम, मुंबई या ठिकाणी एक बोगस कॉल सेंटर मिळून आले. सदर ठिकाणी काही इसम हे त्यांच्याकडे कोणताही अधिकृत परवाना नसताना तसेच भारतीय रिझर्व्ह बॅंकेने 'फॉरेक्स ट्रेडींग' करण्यावर बंदी घातली असताना भारतीय नागरीकांना वेगवेगळया माध्यमातुन संपर्क करून त्यांना चांगल्या परताव्याचे अमिष दाखवून 'फॉरेक्स ट्रेडींग' मध्ये गुंतवणूक करण्याच्या नावाखाली त्यांच्याकडून पेमेंट गेटवेच्या माध्यमातुन पैसे स्वीकारून त्यांची कोणतीही ट्रेडींग न करता फसवणूक करताना मिळून आले.

नमुद कारवाई मध्ये एकुण १२ मोबाईल फोन, २२ हार्ड डिस्क, ०१ मॉनीटर, ०२ सीपीयु, ०१ राउटर, ०१ लॅपटॉप, ०१ किबोर्ड, १२ हेडफोन माईक तसेच इतर महत्वाचे दस्तऐवज जप्त करून तेथील ०२ मालक, ०५ टिम लिडर, ०१ कॉलसेंटर सेल्स मॅनेजर, ११ ऑपरेटर व असे एकुण १९ आरोपींना अटक केली आहे. सदरबाबत विहीत कलमांन्वये एकूण ०२ गुन्हे दाखल करण्यात आले असून सदर गुन्हयातील सर्व आरोपी यांना पोलीस कोठडी मिळणेकरीता मा. न्यायालयात हजर ठेवण्यात येत असून वर नमुद गुन्हयांचा पुढील तपास गुन्हे शाखेकडून करण्यात येत आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. विवेक फणसळकर, मा. विशेष पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. शशि कुमार मीना, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. विशाल ठाकूर, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पश्चिम), श्री. प्रशांत राजे, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-उत्तर), श्री. राजेंद्र शिरतोडे यांचे मार्गदर्शनाखाली, कक्ष-१० यांचे प्र.पो.नि. श्री. दिपक सावंत, पो.नि. श्री. मनोज सुतार, स.पो.नि., श्री. गणेश तोडकर, श्री. रोहित नार्वेकर, श्री. अफरोज शेख, पोलीस अंमलदार स.फौ. कांबळे, पो.ह. धारगळकर, माने, खरात, मोरे, चवरे, चिकणे, पो.शि. डफळे, निर्मळे, म.पो.शि. सोनवणे, पो.शि.चा. झरेकर, शिंदे तसेच कक्ष-११ यांचे व.पो.नि. श्री. महेश निवतकर, पो.नि. काकडे, पो. उप.नि. शिंदे, पो.उप.नि. सावंत पोलीस हवालदार देशमुख, सुर्वे, केणी, खांडेकर, खताते, कदम, सावंत, मपोह लाडे, कदम, मपोशि गोसावी, सफौ.चा. ढगे यांनी यशस्वीरित्या पार पाडली.